गोदातीर समाचार
स्थापना १९६२
www.godateer.com

# मुदखेड तालुका कृषी कार्यशाळेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**मुदखेड–** तालुका कृषी कार्यालयात खरीप हंगाम पूर्व तयारी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत शेतकयांना बियाणे कसे निवडावे, खत कोणते वापरावे, त्याची गुणवत्ता कशी तपासावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



उपविभागीय कृषी अधिकारी दत्त कुमार कळसाईत यांनी शेतकऱ्यांना .मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित कृ.वि. कें पोखर्णी येथील शास्त्रज्ञ डॉ. संदीप जायभाये यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पिकांचे कोणते वाण वापरावे ह्याविषयी माहिती दिली. त्यामध्ये सोयाबीन वाणाची निवड, लवकर येणारे व उशिरा येणारे वाण, परभणी कृषि विद्यापीठ प्रचलीत वाण-MUS-71,MUS-612,MUS -162,M-US-158 व MUS -725 या वाणाची वैशिष्ट्यांबाबत माहिती दिली. पोखर्णी येथील शास्त्रज्ञ डॉ. माणिक कल्याणकर यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पिकावरील किड व रोग कशा प्रकारे येतात, त्यावरील उपाययोजना सोयाबीन वरील रोग पिवळा मोझॅक, मुळकुज, तसेच किडी खोड किडा, खोड माशी, पाने खाणारी अळी इ. व तुर पिकावरील मर रोग ,व पाने गुंडाळणारी अळी इ. यावरील उपाय व व्यवस्थापन कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच चव्हाण यांनी ट्रायकोड्माचे उपयोग उपलब्ध जैविक संवर्धक यांची बिज प्रक्रीया कसी करावी व ट्रायकोड्मा सर्वच पिकांना कशाप्रकारे उपयोगी आहे, याविषयी माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी मुद्खेड डॉ. अमरज्योती गच्चे यांनी सांगितले, कृषी विभागाच्या योजना, CMKSY शेततळे करणे, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड, MREGS फळबाग लागवड करणे, सोयाबीन बियाणे किंवा कापुस बियाणे खरेदी करताना पक्की पावती व लेबल असलेले बियाणे खरेदी करावे. शेतकऱ्यांना बियाणे उगवण क्षमता चाचणी प्रात्यक्षिक व बिजप्रक्रीया कशी करावी याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. उगवण क्षमते नुसार बियाण्याचे प्रमाण कमी जास्त करण्याविषी सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञान शेतीत वापरल्यास उत्पन्न वाढण्यास नक्कीच फायदा होईल. तसेच यावर्षी मान्सून अगदी वेळेत असून अनुकूल असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे असे देखील त्यांनी मार्गदर्शनातून शेतकऱ्यांना सांगितले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम कपाटे यांनी केले. आभारप्रदर्शन व्ही. बी. गिते यांनी केले. उपविभागीय कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृ. वि.कें. पोखर्णी येथील वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. संदीप जायभाये, डॉ.माणिक कल्याणकर, महबिजचे चव्हाण, तालुका कृषि अधिकारी डॉ. अमरज्योती गच्चे, मंडळ कृषी अधिकारी पि. टी. हिलालपुरे, कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व प्रगतीशील शेतकरी यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न झाली.

श्रमिक एकजूट

साहेबराव हौसरे

# मुदखेड येथे खरीप हंगामपूर्व तयारी ; तालुकास्तरीय कार्यशाळा व प्रशिक्षण संपन्न

मुदखेड (वार्ताहर)-तालुका कृषी कार्यालय मुदखेड येथे कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय कृषी अधिकारी .दत्तकुमार कळसाईत यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषी विभागाच्या योजना विषयी, सोयाबीन बियाणे बि.बि.एफ. पध्दतीने व टोकण पद्धतीने लागवड करावी, सोयाबीन वरील किड व रोग व्यवस्थापन,निंबोळी अर्क वापरणे, दशपर्णी अर्क तयार करणे,जैविक बुरशीनाशके यांचा वापर करणे तसेच शेतकरी गट करणे, व्हाट्सअप गृप तयार करणे,तंत्रज्ञान हवामान अनुकूल शेतीवर आधारित फळबाग लागवड कृषी करावी, इ.विषयावर मार्गदर्शन केले तसेच उपस्थित कृ.वि.कें पोखर्णी येथील शास्त्रज्ञ डॉ.संदीप जायभाये सर (वरिष्ठ शास्त्रज्ञ -कृषि विद्यावेत्ता) यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पिकांचे कोणते वाण वापरावे ह्याविषयी माहिती दिली त्यामध्ये सोयाबीन वाणाची निवड,लवकर येणारे व उशिरा येणारे वाण,परभणी कृषि विद्यापीठ प्रचलीत वाण-७१,-६१२, -१६२,-१५८ व -७२५ या वाणाची वैशिष्ट्ये कोणत्या किडीला व रोगाला बळी पडत नाहीत याविषयी माहिती दिली. त्यांनी सोयाबीन पिकाला एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे गरज असते त्यामुळे एकरी दीड पोते १२-३२-१६ व सोबत ८ किलो गंधक देणे उपयुक्त आहे.शेतकरी २०-२०-०-१३ देतात पण त्यात पालाश नाही आणि सोयाबीन पिकाला पालाश ची गरज असते.त्यामुळे आवश्यक आणि योग्य खत दिल्यास खर्चात बचत होते हे देखील सांगितले.तसेच



तुर पिकांमध्ये कोणते बियाणे वापरावे त्यांचे वाण-लालतुरीसाठी-७१६ व तसेच पांढरीतुर-७११, गोदावरी या वाणाची लागवड करण्याविषयी शेतकर्यांनी सखोल असे मार्गदर्शन केले तसेच कृ. वि. कें.पोखर्णी येथील शास्त्रज्ञ डॉ.माणिक कल्याणकर (वरीष्ठ शास्त्रज्ञ-विकृतीशास्त्र) यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पिकावरील किड व रोग कशा प्रकारे येतात, त्यावरील उपाययोजना सोयाबीन वरील रोग पिवळा मोझॅक, मुळकुज, तसेच किडी खोड किडा, खोड माशी, पाने खाणारी अळी इ. व तुर पिकावरील मर रोग,व पाने गुंडाळणारी अळी इ. यावरील उपाय व व्यवस्थापन कसे करावे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच श्री.चव्हाण यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ट्रायकोड्रमा चे उपयोग उपलब्ध जैविक संवर्धक यांची बिजप्रक्रीया कसी करावी व ट्रायकोड्रमा सर्वच पिकांना कशाप्रकारे उपयोगी आहे.याविषयी माहिती दिली.व तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी मुद्खेड डॉ. अमरज्योती गच्चे मॅडम यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले,कृषी विभागाच्या योजना, शेततळे करणे,भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड, फळबाग लागवड करणे, सोयाबीन बियाणे किंवा कापुस बियाणे खरेदी करताना पक्की पावती व लेबल असलेले बियाणे खरेदी करावे, व उपस्थित शेतकर्यांनी बियाणे उगवण क्षमता चाचणी प्रात्यक्षिक व बिजप्रक्रीया कसी करावी याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले व उगवण क्षमते नुसार बियाण्याचे प्रमाण कमी जास्त करण्याविषी सांगितले व सखोल असे मार्गदर्शन केले तसेच हंगाम पूर्व कार्यशाळा व प्रशिक्षण आयोजित करून अगदी वेळेपूर्वी योग्य मार्गदर्शन झाल्याने सांगण्यात आलेले सर्व आधुनिक तंत्रज्ञान शेतीत वापरल्यास उत्पन्न वाढण्यास नक्कीच फायदा होईल.तसेच यावर्षी मान्सून अगदी वेळेत असून अनुकूल असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे असे देखील त्यांनी मार्गदर्शनातून शेतकऱ्यांना सांगितले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. राम कपाटे यांनी केले, कार्यक्रमाची प्रस्तावना श्रीमती. डॉ.अमरज्योती गच्चे मॅडम यांनी केली तर आभारप्रदर्शन व्ही.बी.गिते यांनी केले त्यावेळी उपविभागीय कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत कृ.वि.कें. पोखर्णी येथील वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ.संदीप जायभाये व डॉ.माणिक कल्याणकर सर व महबिजचे श्री.चव्हान व सोनटक्के तालुका कृषिअधिकारी डॉ.अमरज्योती गच्चे मॅडम व मंडळ कृषी अधिकारी पि.टी.हिलालपुरे तसेच कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी व प्रगतीशील शेतकरी/शेतकरी वर्ग यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळा संपन्न झाली.